# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईतील स्मारकाच्या कामाबाबत**

**(१) १८ (३०-०४-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादरच्या इंदू मिल येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम माहे डिसेंबर, २०२५ मध्ये पुर्ण करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरचे काम मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत करण्यांत येणार असून अद्याप स्मारकाचे ५० टक्केच काम पूर्ण झाले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांचे उर्वरित राहिलेले काम १२ महिन्यांत पूर्ण होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (३०-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.०६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत माहे, ऑक्टोबर २०२६ पूर्वी स्मारक प्रकल्पाची प्रस्तावित कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही प्रस्तावित आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०५.२०२५ रोजीच्या बैठकीत कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी इंदू मिल येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकाच्या बांधकामाबाबत खालीलप्रमाणे माहिती बैठकीत सादर केली आहे.

☐ प्रकल्पाच्या इमारतीच्या कामांची वैशिष्टे-

१. प्रवेशव्दार इमारत - ८८.५% काम पूर्ण.
२. व्याख्यान वर्ग – ७८.७५% काम पूर्ण.
३. ग्रंथालय – ८१.२०% काम पूर्ण.
४. प्रेक्षागृह – ६८.१५% काम पूर्ण.
५. स्मारक इमारत - ५३% काम पूर्ण. (पुतळा-१:१ थरमाकोल मॉडेल २३० फूट पर्यंत पुर्ण)
६. बेसमेंट वाहनतळ - ९५ % काम पूर्ण.

☐ भौतिक प्रगती - ४९.५%, आर्थिक प्रगती - ४०%

(३) विभागाच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.०६.२०२५ रोजीच्या

बैठकीत माहे, ऑक्टोबर २०२६ पूर्वी स्मारक प्रकल्पाची प्रस्तावित कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी बैठका आयोजित करून सदर काम विहित वेळेत पुर्णत्वास नेण्याचे प्रयोजन आहे.

---

**पंतप्रधान आवास योजनेंतर्गत भागीदारी प्रकल्प सुरु होण्याआधीच विकासकांना राज्य आणि केंद्राच्या हिश्श्यापोटीची रक्कम वितरीत केल्याबाबत**

**(२) २६ (२७-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत भागीदारी प्रकल्प सुरु होण्याआधीच खासगी विकासकांना राज्य आणि केंद्राच्या हिश्श्यापोटी ५० कोटीहून अधिक रकमेचे वितरण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये गृहनिर्माण विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गृहनिर्माण विभागाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारणाकडून तातडीने अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, अहवालाच्या शिफारशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) व (२) खाजगी-भागीदारी प्रकल्पातील विकासकांना आगावू अनुदान वितरीत करण्याची बाब निदर्शनास आल्यानंतर शासनपत्र दिनांक २४.१०.२०२४ अन्वये म्हाडाला कळविण्यात आले आहे.
(३) व (४) याबाबतचा अहवाल म्हाडा प्राधिकरणाने सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेतील शाळेचे एकत्रीकरण करण्याबाबत**

**(३) ९२ (०५-०५-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेच्या एकाच आवारातील मुले व मुलींच्या वेगवेगळया भरत असलेल्या तीन शाळांचे एकत्रीकरण करण्याबाबत शासनाचे धोरण असल्याचे पुणे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आला असल्याचे माहे जाने २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि जिल्हा परिषद माध्यमिक शाळा एकाच परिसरात भरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच आवारात शाळा भरत असताना शाळांना वेगवेगळे मुख्याध्यापक न नेमता एकाच मुख्याध्यापकांच्या नियंत्रणाखाली शाळा कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळा एकत्रिकरणामुळे पटसंख्या व मुला मुलींना एकत्रित शिक्षण घेता येते तसेच शालेय प्रशासन, व्यवस्थापन व सहशालेय उपक्रम यामध्ये सुसूत्रता येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मराठवाड्यातील जालना जिल्हयामध्ये शाळांचे एकत्रिकरणाबाबतचा प्रस्ताव संबंधित शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने तयार करण्याबाबत तसेच प्रस्तावास जिल्हा परिषदेच्या प्रशासक सल्लागार समितीने मंजुरी दिली आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्हयातील ४ शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीने, एकाच आवारात मुले-मुलींच्या वेगवेगळया भरत असलेल्या शाळा एकत्रिकरण करण्याचा ठराव मंजूर करुन सदर शाळा एकत्रिकरण करण्यास मंजूरी मिळावी असा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. पुणे यांना सादर केला आहे.

(२) काही जिल्हा परिषद शाळांबाबत ही वस्तुस्थिती आहे.

(३) हे खरे नाही,

संचमान्यतेच्या निकषानुसार पदांची अनुज्ञेयता निश्चित केली जात असल्याने अशी वस्तुस्थिती नाही.

(४) हे खरे आहे,

सहशिक्षणामुळे समानतेचे वातावरण निर्माण होणे, परस्पर आदर आणि समज वाढते, निरोगी सामाजिक आणि संवाद कौशल्यांना प्रोत्साहन मिळते आणि विद्यार्थ्यांना शाळेनंतर येणाऱ्या वैविध्यपूर्ण वास्तविक जगाच्या वातावरणाकरीता तयार करते. शालेय शिक्षणाच्या वयात व्यतिमत्वाची निकोप वाढ व्हावी या भूमिकेतून सहशिक्षणाच्या शाळा चालविणे कालसुसंगत आहे.

(५) जिल्हा परिषद, जालना यांचेकडून एकाच प्रांगणात असलेल्या २३ जिल्हा परिषद शाळांचे एकत्रिकरण करण्यात आलेले आहे. तसेच, शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार एकाच प्रांगणातील केंद्रीय प्राथमिक शाळा परतूर ऊर्दू व प्रशाला परतूर ऊर्दू या दोन्ही शाळांचे केंद्रीय प्राथमिक शाळा नुतन परतूर ऊर्दू या शाळेत एकत्रिकरण करण्यात आलेले आहे.

तसेच, शासन शुध्दीपत्रक दिनांक ०७.१०.२०२५ अन्वये एकाच आवारात मुले व मुलींच्या स्वतंत्र शाळांचे रुपांतरण सहशिक्षणाच्या शाळेत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबतच्या अंमलबजावणीचे अधिकार आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटविण्याबाबत**

**(४) २८१ (२७-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून ३८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स डिसेंबर महिन्यात हटविण्यात येऊन ७६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे महापालिका हद्दीत अधिकृत फलक लावण्यासाठी जाहिरात विभागाने जागा निश्चित करुन त्याचे शुल्क भरून केवळ त्याच ठराविक भागात लावण्यात यावेत असे निदेश उपायुक्त, ठाणे यांनीसंबधिताना दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निदेशनाच्या अनुषंगाने ठाणे महापालिका हद्दीत अधिकृत किती फलक लावण्यात आले आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत एकूण ९,७४० अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फ्लेक्स व जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात आली असून, १२९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अधिकृत जाहिरात फलक लावण्यासाठी एकूण २०४ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

(३) ठाणे महानगरपालिका हद्दीत अधिकृत फलक लावण्यासाठी, महानगरपालिकेने एकूण २०४ जागा निश्चित केल्यानंतर, दिनांक ०९ एप्रिल, २०२४ ते दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत निश्चित केलेल्या जागांपैकी १९ ठिकाणी फलक लावण्यास परवानगी देण्यात आली आहे.

---

**राज्य शासनाच्या विविध विभागात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) ३०६ (०८-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या दोन वर्षापासून मेगा भरतीची घोषणा केल्या जात असून प्रत्यक्षात ७ लाख २४ हजार कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असताना केवळ ४ लाख ७८ हजार कर्मचारी कार्यरत असल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या विविध विभागात कर्मचाऱ्यांची तब्बल २ लाख ४५ हजार ९४४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने गेल्यावर्षी राज्यसेवेची ४५७ जागांसाठी जाहीर करण्यात आली असून यासाठी सुमारे अडीच लाखांवर अर्ज आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मात्र यात अधिकारी पदाच्या ३७ संवर्गपैकी १५ पदांची एक ही जागा नसल्याने विद्यार्थी आंदोलन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण वाढले असताना शासनाने विविध विभागातील मंजूर रिक्त पदे भरण्याबाबत व पद संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०२६) :** (१) व (२) वित्त विभागाच्या सेवार्थ प्रणालीनुसार दिनांक ७.१०.२०२४ रोजी सर्वसाधारण ७,६५५१४ मंजूर पदांपैकी ५,०१,४४४ पदांवर अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून, २,६४,०७० पदे रिक्त दिसून येत आहे.

(३) राज्य सेवा परीक्षा-२०२४ साठी एकूण ४७७ पदांकरीता प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरुन एकूण २,२९,२९५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहे.

(४) राज्य सेवा परीक्षा अंतर्गत एकूण ३५ संवर्ग असून प्राप्त झालेल्या मागणीपत्रांनुसार राज्य सेवा परीक्षा-२०२४ च्या जाहिरातीतील २० संवर्गाच्या एकूण ४७७ पदांचा समावेश आहे.

(५) व (६) शासनातील विविध पदांवर पदभरती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून, नवीन पदनिर्मितीमुळे अथवा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून वित्त विभागाच्या धोरणानुसार पदभरती करण्यात येते.

---

**मुंबईतील अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ४५९ (२८-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.राहुल ढिकले**

**(नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे मा.पंतप्रधान यांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी जल पुजनाचा कार्यक्रम होऊन ही अद्यापपर्यंत शिवस्मारकांचे काम प्रलंबित असल्याने नागरीकांनी मुंबई महापालिका मुख्यालयासमोर दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाचे प्रलंबित असलेले काम लवकरात लवकर मार्गी लावण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०१-२०२६) :** (१) अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे मा.पंतप्रधान यांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी जल पुजनाचा कार्यक्रम होऊन कामाला सुरुवात होण्यापूर्वी प्रकल्प न्यायप्रविष्ठ झाल्याने प्रत्यक्ष कामाला सरुवात झाली नाही. मुंबई महानगरपालिका मुख्यालयासमोर दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या आंदोलनाबाबत विभागास कळविल्याचे दिसून येत नाही.
(२), (३) व (४) मुंबई अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याबाबत बाब ही न्याय प्रविष्ठ असून प्रकरणी मा.न्यायालयाच्या अंतिम आदेशास अनुसरुन सदर प्रकल्पाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**नागपूर येथील फुटाळा तलावाच्या काही भागावर झालेले अतिक्रमण**

**(७) ५४६ (२८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील फुटाळा तलाव वायू सेना रोड ते टेकडीपर्यंत अस्तित्वात असून त्या ठिकाणी सध्या बॉटनीकल गार्डन असल्याने तलावाच्या जागेवर नागपूर महानगरपालिकेच्या एका ठेकेदाराने अतिक्रमण करून कंपाउंड वॉल बांधून ती जमीन रोड जेटपॅचर आणि औद्योगिक उद्दिष्टांसाठी वापरत आहे, तसेच जिल्हा नियोजन समितीने तीन वर्षांपूर्वी सामुदायिक सभागृहाच्या बांधकामासाठी रु. ५० लाख रुपये मंजूर केल्यानंतर नागपूर महानगरपालिकेने सन २०२२ मध्ये वा त्यासुमारास या सभागृहाच्या बांधकामासाठी निविदा प्रसिद्ध करुन ठेकेदाराला कामाचे आदेश दिले तथापि सदरहू सभागृहाचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने नागपूर महानगरपालिकेला पत्र लिहून फुटाळा तलावाचा काही भाग एका कुटुंबाने अतिक्रमण करुन विविध कार्यक्रमासाठी भाडयाने दिल्याची तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या मालकीच्या पाणलोट क्षेत्रामध्ये भर घालून दोन बेकायदेशीर निवासी इमारती बांधल्याची बाब निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण निष्कासित करुन अतिक्रमण करणाऱ्यांवर तसेच यास जबाबदार असलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तसेच १२ वर्षापासून जागेचा बेकायदेशीर वापर करण्यासाठी दंडात्मक शुल्क वसूल करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

फुटाळा तलावाच्या वायव्य (North West) दिशेस बॉटनीकल गार्डन असून त्याची मालकी डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ यांची आहे.

ठेकेदाराद्वारे अतिक्रमित जागा ही फुटाळा तलावाची नाही. फुटाळा तलावाच्या दक्षिणेस रस्त्याच्या पलीकडे महानगरपालिकेच्या मालकीची यापैकी ख. क्र. १५ मौजा पांढरबोडी ही जागा व खासगी मालकीची ख. क्र. ६ मौजा फुटाळा ही जागा अशा जागा आहेत. हे - दोघांमध्ये शिव पानंद ही आहे. या जागांवर ठेकेदाराने अतिक्रमण केले आहे.

ख.क्र. १५ मौजा पांढरबोडी या जागेवर नागपूर महानगरपालिकेद्वारे योग भवन सभागृहाच्या बांधकामासाठी ५० लाख रुपये किंमती करीता दिनांक २७.०७.२०२२ रोजी योगा भवनाचे बांधकामाकरीता रितसर निविदा काढून मे. नरेश बी.बनीया यांना कार्यादेश देण्यात आला आहे व सदर बांधकाम सुरु करण्याकरीता दिनांक २५.०१.२०२३ ला विषयांकीत जागेचे नगर भूमापन विभागामार्फत सिमांकन करण्यात आले आहे.

तथापि खाजगी जागेचे मालक श्री. नरेंद्र जिचकार व श्री. महेंद्र जिचकार यांच्यामार्फत मा. न्यायालयात निविदा प्रक्रियेबाबत C.S.No. ३६७/२०२३ व महानगरपालिकेच्या जागेबाबत C.S.No. १३९/२०२३ प्रकरणे दाखल करण्यात आले आहेत व सदर प्रकरणात मा. न्यायालयाने दिनांक ०४.०२.२०२३ व दिनांक १७.०६.२०२३ ला दिलेल्या स्थगनादेशामुळे योगा भवनाचे काम सुरु करण्यात आलेले नाही.
प्रशासकीय कारणास्तव
(२) व (३) होय, हे खरे आहे,

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठामार्फत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना दिनांक १८.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री. दिलीप चौधरी यांच्याद्वारे अतिक्रमीत जमिनीचा ताबा घेण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

मौजा तेलंगखडी, खसरा क्र. २0 या महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाच्या जागेवर श्रीमती मीना दिलीप चौधरी यांनी अतिक्रमण केलेल्या लॉन, रेस्टॉरंट, टिनाचे शेड व नमुद दोन बेकायदेशीर इमारती विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) व ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे. महानगरपालिकेतर्फे तामील करण्यात आलेल्या नोटीसीविरुध्द श्रीमती चौधरी यांनी मा. न्यायालयात प्रकरण दाखल केले असून मा. न्यायालयाने दिनांक १९.०३.२०२५ रोजी स्थगनादेश दिलेला आहे. उपरोक्त स्थगनादेशाविरुध्द महानगरपालिकेकडून अपील दाखल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## काचिपुरा(नागपूर) येथील शेतीसाठी असलेल्या जमिनीवरील बेकायदेशीर व्यावसायिक आस्थापनांबाबत

**(८) ५७२ (२८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील काचिपुरा येथे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषी शिक्षण व संशोधनासाठी राखीव असलेल्या जागेवर 70 पेक्षा अधिक व्यावसायिक आस्थापना विनापरवानगी उभारली गेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने सन २०१५ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमांतर्गत संबंधित अनधिकृत बांधकामांना बजावलेल्या नोटिसांना राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने स्थगिती दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याचिका क्रमांक १४६०४/२०२४ मध्ये दिनांक १७ डिसेंबर, २०२४ अन्वये सर्वोच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्याबाबत तसेच सदर जमिनीवर कृषी शिक्षण व संशोधन पुन्हा सुरू करण्याचे निर्देश पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मौजा लेंड्रा येथील बजाजनगर ते काचीपूरा हा २४.०० मी. रुंद विकास योजना रस्ता (DP Road) असून नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना नकाशानुसार बजाज नगर ते काचीपूरा येथील रस्त्याच्या डाव्या बाजूस खालीलप्रमाणे आरक्षणे आहेत.

१) आरक्षण क्र. W-२२ STS (State Transport)

२) आरक्षण क्र. W-३९ PTS (Police Station)

३) आरक्षण क्र. W-४५ (Parking)

तसेच, उर्वरित जागा सार्वजनिक/ निमसार्वजनिक या विभागात समाविष्ट असून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या मालकीची आहे. सदर जागेचे स्थळनिरीक्षण केले असता, विषयांकित जागेच्या काही भागात व्यावसायिक आस्थापनांचा वापर सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विभागीय कार्यालय धरमपेठ झोनतर्फे सदर जागेवरील एकूण २७ आस्थापनांना अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अंतर्गत दिनांक १५.०७.२०१५ मध्ये नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीविरोधात काही व्यावसायिकांनी मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मुंबई यांचेकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये माहे जानेवारी, २०१६ मध्ये अपील दाखल केली होती. सदर अपीलाच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक २०.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेच्या कार्यवाहीस, पुढील आदेशापर्यंत तसेच मा.न्यायालयाचे काही आदेश असल्यास त्यास अधीन राहून स्थगिती देण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी रिट याचिका (दिवाणी) क्र.२९५/२०२२, रिट याचिका (दिवाणी) क्र.३२८/२०२२ व इतर मध्ये दिनांक १७.१२.२०२४ रोजी दिलेले आदेश हे अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याच्या दिशा निर्देशाबाबतचे आहेत.

(४) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७.१२.२०२४ रोजी प्रमाणे दिलेले आदेश हे अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करताना कोणती Sop Follow करण्यात यावी याबाबत आहेत. सदर आदेशात दिलेल्या निर्देशांचे कार्यवाही दरम्यान पालन करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शहरी भागात काम करणाऱ्या चाकरमान्याकरीता परवडणाऱ्या भाड्याच्या घराचे धोरण ठरविणेबाबत.

**(९) ६४७ (२७-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागात काम करणा-या चाकरमान्यांकरिता राहण्याकरिता भाडयाच्या घरांची वाढती मागणी लक्षात घेऊन घरमालकासोबतच भाडेकरुचेही हित जपले जावे, कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारच्या निर्देशानुसार म्हाडाकडून परवडणा-या भाडयाच्या घराचे धोरण ठरविण्यात आले आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत केंद्र

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भाडे तत्वावर घरांची निर्मिती (Affordable Rental Housing- ARH) या घटकांची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत शासनाने दिनांक १५.१०.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. भाडे तत्वावर घरांची निर्मिती या घटकाची अंमलबजावणी म्हाडामार्फत करण्यात येत असल्याने त्यांना भाडे तत्वावर घरांच्या निर्मितीचे धोरण (ARH) सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**पुणे येथील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो मार्गावर तीन ऐवजी पाच मेट्रो स्टेशन उभारण्याबाबत**

**(१०) ७७४ (२९-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो मार्गावर तीन ऐवजी पाच मेट्रो स्टेशन उभारण्याबाबत प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) बालाजीनगर आणि सहकारनगर-बिबवेवाडी या प्रस्तावित स्थानकांचा समावेश करण्यासाठी तसेच फीडर सेवा सक्षम करण्यासाठी पीएमपी थांबे, रिक्षा स्थानके मेट्रो स्थानकांजवळ आणण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) या मेट्रो मार्गिकांना केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता तसेच स्वारगेट येथे ‘मल्टीमोडल ट्रान्स्पोर्ट हब’ उभारण्यासाठी ‘महामेट्रो’ आणि ‘एमएसआरटीसी’ यांच्यातील प्रस्तावित कराराच्या मसुद्याला मंजुरी मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२५) :** (१) व (२) स्वारगेट ते कात्रज या विस्तारीत मेट्रो मार्गावर बालाजीनगरव बिबवेवाडी ही दोन नवीन मेट्रो स्थानके उभारण्यास दिनांक ११.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

पुणे मेट्रो टप्पा-१ अंतर्गत फीडर सेवा सक्षम करण्यासाठी मेट्रो स्थानकांजवळ पीएमपीएल बस थांबे निर्माण करण्यात आले आहेत. रिक्षा थांबण्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. या सुविधा पुणे मेट्रोच्या विस्तारीत मेट्रो मागावरील स्थानकांर सुध्दा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

(३), (४) व (५) वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) या विस्तारीत मेट्रो रेल्वे मार्गिका प्रकल्पास दिनांक १६.०७.२०२५ रोजी केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या बांधकामाच्या अनुषंगाने प्राथमिक कामे सुरु आहेत.

स्वारगेट येथे मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब उभारण्यासाठी महामेट्रो, एमएसआरटीसी व पीएमपीएमएल यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करारनामा करण्यात येत आहे. तद्नंतर प्रकल्पाचे काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. सदरहू प्रकल्पाचा मा. मुख्यमंत्री वॉर रुम तसेच मा. उपमुख्यमंत्री प्रकल्प संनियत्रण कक्षाद्वारे नियमित आढावा घेण्यात येत आहेत.

---

**नवले पूल (जि.पुणे) येथे एसटी बस थांबा उभारण्याबाबत**

**(११) ८३० (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवले पूल (जि.पुणे) येथे उड्डाणपुलाचे काम पूर्ण होईपर्यंत कोकण, कोल्हापूर, सांगली, सातारा यांसारख्या मार्गांवर जाणाऱ्या एसटी प्रवाशांसाठी थांबा व अन्य सोयी सुविधा उभारण्यात येणार आहेत काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी प्रवाशांच्या गैरसोयी आणि बसचे होणारे आर्थिक नुकसानीचे निराकरण करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नवले पूल येथे एसटी बस थांबा उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१२-०१-२०२६) :** (१), (२), (३) व (४) एस.टी प्रवाशांना मार्गदर्शन करण्याकरिता तसेच बसचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याकरिता नवले पुल येथे वाहकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

**पुणे येथील उत्तमनगर आरोग्य उपकेंद्रातील समस्यांचे निराकरण करणेबाबत**

**(१२) ८३८ (३०-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील उत्तमनगर आरोग्य उपकेंद्राच्या वीजबिलासह आवश्यक खर्चासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य उपकेंद्रातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, व दुर्गंधीमुळे होणारे आरोग्यविषयक धोके टाळण्यासाठी कोणत्या सुधारणा करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, सदर परिसरात दारूड्यांचा वावर असल्याने असुरक्षितता रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) असल्यास, गरोदर माता व बालकांसाठी सुरू असलेल्या आरोग्य सेवांचा व्यवस्थित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०१-२०२६) :** (१) उत्तमनगर उपकेंद्रास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु.३७,५००/- अनुदान दिले होते. सदर अनुदानातून खर्च वजा जाता दिनांक १७.१०.२०२५ अखेर रु.४३५/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

सदर उपकेंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्र, सांगरुन अंतर्गत येत असून प्रलंबित विज देयक हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जन आरोग्य समिती (आरकेएस) मधून अदा केले होते.
(२) उपकेंद्राची इमारत मुख्य रस्त्यावर असून इमारत सोडून इतर कोणतीही मोकळी जागा नाही.

उपकेंद्राच्या इमारतीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांमार्फत केली जाते.

उपकेंद्र इमारतीच्या बाहेरील स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापन पुणे महानगरपालिकेमार्फत केले जाते.
(३) महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यावर उपकेंद्र इमारत असल्याने लोकांची वर्दळ असते.

उपकेंद्राच्या वेळेमध्ये दारुडया लोकांच्या वावराबाबत कोणतीही तक्रार अद्याप आरोग्य विभागास प्राप्त झालेली नाही.
(४) माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत उत्तमनगर उपकेंद्रात दरमहा ३ आरोग्य सेवा सत्रांचे नियमितपणे आयोजन केले जाते व त्यात गरोदर माता व बालकांची तपासणी करुन लसीकरणासह सेवा दिल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया सुरु करणेबाबत**

**(१३) ८६६ (२४-०४-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया संबंधी माहे जानेवारी, २०२१ मध्ये जाहिरात देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी पासून पाच दिवस कागदपत्रांची पडताळणी झाली होती तसेच सदर भरती प्रक्रियेला चार वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी झाला आहे मात्र ही भरती प्रक्रिया कोणतेही कारण नसताना थांबिविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सध्या संबंधित विभाग तसेच अधिकारी यांना भरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत निवेदन देऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर भरती प्रक्रिया सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अशंतः खरे आहे.

चंद्रपूर जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील (चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा) नोंदीत मुख्य मालकांना (कारखाना आस्थापना इ.) त्यांच्या मागणीनुसार सुरक्षा रक्षक पुरविण्याकरीता ५०० सुरक्षा रक्षकांचा समुच्चय पुल तयार करण्याबाबत मंडळामार्फत माहे जानेवारी, २०२१ मध्ये वृत्तपत्रात जाहिरात देवून दिनांक १५.०१.२०२१ ते दिनांक ३०.०१.२०२१ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. मंडळाकडे एकूण ३६६२ ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले होते. प्राप्त अर्जावर दिनांक ०७.१२.२०२१ पासून कागदपत्रे तपासणीकरीता उमेदवारांना बोलावून मुळ कागदपत्रे तपासणीची कार्यवाही पार पाडण्यात आली होती.

दरम्यानच्या कालावधीत राज्यातील सर्व सुरक्षा रक्षकांच्या भरतीबाबत नव्याने धोरण तयार करण्याची प्रक्रीया सुरू होती. त्यास अनुसरून दिनांक २७.०३.२०२५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत उपरोक्त अर्जदार तसेच आस्थापनांची मागणी याचा विचार करून भरतीप्रक्रियेस नियमानुसार मान्यता देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भव नाही.

---

## मुबईतील गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना मुंबईत हक्काचे घर मिळण्याबाबत

**(१४) ८८८ (०१-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना मुंबईत हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून गिरणी कामगारांसाठी बांधण्यात येणाऱ्या घरांची लॉटरी मागील चार वर्षांपासून काढण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगारांनी हक्काची घरे मिळावीत व आपल्या न्याय मागण्यांसाठी ग्रँट रोड ते ऑगष्ट क्रांती मैदानादरम्यान दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने आतापर्यंत बहुतांश गिरणी कामगारांना घरे मिळाली असून उर्वरित कामगार व वारसदार बाकी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या मयत गिरणी कामगारांच्या वारसांनी अदयाप अर्ज केलेले नाही त्या वारसदारांकडून विहित मुदतीत अर्ज दाखल करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) गिरणी कामगारांना घरकुले देण्याच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १५.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

बॉम्बे डाईंग व न्यु ग्रेट ईस्टर्न मिलच्या जमिनीवर गिरणी कामगारांकरिता सदनिका बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहे. सदर सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदनिकांची सोडत काढण्यात येईल.

(२) गिरणी कामगार संघटनेकडून अशा आशयाचे निवेदन अथवा अर्ज अभिलेखात आढळून येत नसल्याचे म्हाडाने कळविले आहे.

(३) आतापर्यंत १५,८७० घरकुले सोडतीद्वारे गिरणी कामगार किंवा त्यांच्या वारसांना वाटप करण्यात आले असून, उर्वरित गिरणी कामगारांना घरकुले देण्याच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १५.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांकडून विहीत नमून्यात सन २०१० मध्ये तसेच गिरणी कामगार व वारसांकडून सन २०११ मध्ये ऑफलाईन व २०१७ मध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज पुनश्च स्विकारण्यात आलेले आहेत. तसेच सदर अर्जांची तपासणी कामगार विभाग व म्हाडामार्फत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे, आंबेगाव शिवसृष्टी येथे भुयारी मार्ग अपुरा पडत असल्याबाबत

**(१५) ९०८ (२९-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, आंबेगाव येथे शिवसृष्टी सुरू झाल्याने पर्यटकांच्या संख्येत वाढ होत असल्याने वाहतूकी साठी भुयारी मार्ग अपुरा पडत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवसृष्टी भुयारी मार्ग ते चिंतामणी ज्ञानपीठ रस्त्यावर दरडी कोसळण्याची आणि दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने या रस्त्यावर २०० मीटर लांब आणि सरासरी ४० फूट उंचीची रिटेनिंग वॉल बांधणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटकांच्या वाढत्या संख्येला सामोरे जाण्यासाठी रस्त्यांची रुंदीकरण आणि भुयारी मार्गाची क्षमता वाढवण्यासाठी कोणती तसेच दरडी कोसळण्याच्या संभाव्य धोक्यावर नियंत्रण मिळवून पर्यटकांची सुरक्षितता व दुर्घटनापासून बचाव करण्यासाठी तांत्रिक निरीक्षणे आणि भूवैज्ञानिक अहवालांच्या आधारे कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, रिटेनिंग वॉल बांधकामाचा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२७-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नवले पूल ते wonder city या लांबीमध्ये

अ) १४१० मी. मध्ये शिवसृष्टि

ब) २४६० मी. D mart समोरचा underpass

क) Rajmata garden underpass

एकूण ३४०९ मी. लांबीमध्ये ३ भुयारी मार्ग असून दोन पदरी सेवा मार्ग बांधण्यात आले आहेत.

(२) व (३) शिवसृष्टी भुयारी मार्ग ते चिंतामणी ज्ञानपीठ रस्ता येथील सेवा रस्त्यासाठी डोंगराकडील भाग खोदकाम केलेला आहे व सदर ठिकाणी १२ मी. उंचीची व २२ मी. लांबीची RCC retaining wall बांधलेली आहे व उर्वरित लांबी साठी concrete guniting केलेली आहे, त्याबाबतची सुरक्षा मान्यता GEOSTAB SOLUTION यांच्या कडून घेतलेली आहे.

(४) सदर ठिकाणची सेवा रस्त्याला आवश्यक असणाऱ्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झालेले आहे त्यामुळे नवीन संरक्षक भिंत बांधणेसाठी निधी उपलब्ध करणे बाबतचे प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यामध्ये निकृष्ट व कालबाह्य पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(१६) ९२१ (२८-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खाद्यपदार्थांच्या दुकानात हलक्या प्रतीचे आणि मुदत संपलेले पदार्थ विक्रीसाठी ठेवले जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पालघर जिल्ह्यातील विशेषत: ग्रामीण भागामध्ये शाळा, महाविद्यालयाच्या परिसरातील मिठाईच्या व इतर दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे व कालबाह्य खाद्यपदार्थ विकले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाप्रकारच्या निकृष्ट व कालबाह्य पदार्थांमुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्टोअर्स व हातगाड्यांवर विक्री होत असलेल्या अन्न पदार्थांचे उत्पादन व विक्रीवर नियंत्रण ठेवणे, गुणवत्ता आणि मुदत तपासणी करणे, अन्नपदार्थांच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र (फूड सर्टिफिकेशन) सुनिश्चित करणे यासंदर्भात निरीक्षण यंत्रणा स्थापित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणारे दुकानदार, हातगाडी विक्रेते यांचेवर कारवाई करणेसह मुदतबाह्य खाद्यपदार्थ विकत न घेण्याबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१९-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) स्टोअर्स व हातगाड्यांवर विक्री होत असलेल्या अन्न पदार्थाची गुणवत्ता आणि मुदत (Best Before Date / Use by Date अनुसरून) यांची तपासणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमन २०११ नुसार अन्न सुरक्षा अधिकारी यांचेमार्फत करण्यात येतात व आवश्यकतेनुसार अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात.

तसेच, अन्न व्यवसायिक यांना अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ त्या अंतर्गत नियम व नियमने मधील तरतुदींचे पालन करण्यासंदर्भात प्रशिक्षण (FOSTAC Training) देण्यात येते.

तसेच, ग्राहकांनी अन्नपदार्थ विकत घेताना उत्पादनाची सत्यता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी ग्राहकांनी अन्न पदार्थाच्या पॅकेजिंगवर तपशील जसे की उत्पादकाचा नाव पत्ता, घटकपदार्थ, उत्पादन दिनांक, Best Before Date / Use By Date इत्यादी तपासून घेण्याबाबत लोकांना शिक्षित करण्यासाठी माहिती, शिक्षण आणि संप्रेषण (IEC) अंतर्गत वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल, सोशल मीडिया आणि स्थानिक केबल टीव्ही या प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती केली जाते.

दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाने पुणे जिल्ह्यातून एकूण १०२८ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत, त्यापैकी ४७८ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. ५९ नमुने कमी दर्जाचे घोषित झाले असून त्यापैकी ३५ प्रकरणी प्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल आहे. तसेच, ०५ प्रकरणी तडजोड दाखल करुन रु.४९,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे व उर्वरित १९ प्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, ५४ नमुने असुरक्षित घोषित करण्यात आले असून त्यापैकी ०९ प्रकरणी खटले दाखल करण्यात आले आहेत व उर्वरित ४५ प्रकरणी खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, ४३७ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल अद्याप प्रलंबित आहेत. तसेच, सदर कालावधीमध्ये मुदतबाहय नमुन्यांप्रकरणी ४ न्यायनिर्णय अर्ज

दाखल केलेले आहेत.

तसेच, सदर कालावधीत अन्न व औषध प्रशासनाकडून पालघर जिल्ह्यातून एकूण ११६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी ९८ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. उर्वरित १८ नमुने कमी दर्जाचे घोषित झाले असून त्यापैकी ०१ प्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल आहे. तसेच, ०६ प्रकरणी तडजोड प्रकरणे दाखल करुन रु.४५,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे व उर्वरित ११ प्रकरणी न्यायनिर्णय/ तडजोड दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विमाननगर, पुणे येथील लाईफ बेरीज हेल्थ केअर डायग्नोस्टिक सेंटरमध्ये प्रशिक्षणाशिवाय कर्मचारी आरोग्य तपासणी यंत्रणा हाताळत असल्याबाबत

**(१७) १००६ (३०-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमाननगर, पुणे येथील लाईफ बेरीज हेल्थ केअर डायग्नोस्टिक सेंटरमध्ये प्रशिक्षणाशिवाय आरोग्य तपासणी यंत्रणा हाताळत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या सुरक्षेसाठी विनापरवाना आरोग्य तपासणी यंत्रणा हाताळणाऱ्या व्यक्तींवर तसेच प्रशिक्षण नसलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी कोणते नियम आणि कायदे लागू करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणातील महिला दंततज्ज्ञ, तिचे सहकारी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी कोणत्या उद्देशाने प्रशिक्षणाशिवाय यंत्रणा हाताळल्या याबाबतची चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालये किंवा डायग्नोस्टिक सेंटर्समध्ये घटण्या-या अशा घटना रोखण्यासाठी शासनाने कोणते धोरणे किंवा नवीन उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२१-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

याबाबतची कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त नसल्याचे पुणे महानगरपालिकेकडून कळविले आहे.

(२) महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम १९४९ व त्या अंतर्गत असलेल्या सुधारीत नियम २०२१, राज्यात लागू करण्यात आले आहेत. सदर अधिनियमांतर्गत दिनांक १४/०१/२०२१ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सद्यस्थितीत दिनांक ०४/०१/२०२५ पासून राज्यात खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्याची धडक मोहिम हाती घेण्यात आली असून दिनांक २२/०२/२०२५ पर्यंत ९९ टक्के पेक्षा जास्त रुग्णालयांची तपासणी स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांचेकडून करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम १९४९, (सुधारीत) २०२१, मधील निकषांची पूर्तता करीत नसलेल्या ४५३८ रुग्णालयांना स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांचेकडून सुधारणा करण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त पदावर सेवानिवृत्त शिक्षकांची भरती केली जात असल्याबाबत

**(१८) १०९१ (१६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त जागांवर सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने

घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयात डी.एड. आणि बी.एड. झालेल्या बेरोजगारांची संख्या तब्बल ११ हजारापेक्षा जास्त असतांना त्या बेरोजगाराना नोकरी न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाच्या दुटप्पी निर्णयांच्या विरोधात विविध शिक्षण संघटनांची तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बेरोजगार सुशिक्षित तरुणांना शिक्षण सेवेत सामावून घेण्याबाबत तसेच सदरील निर्णय मागे घेण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२०-०१-२०२६) :** (१), (२), (३) व (४) दिनांक २३.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक किंवा डीएड व बीएड बेरोजगार उमेदवारांना मानधनावर कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे नियमित शिक्षक उपलब्ध होणार असल्याने, तसेच मानधानावर नियुक्त डीएड व बीएड अर्हताधारक उमेदवार भविष्यात त्यांचे सेवा कायम करणेबाबतची मागणी करु शकतात. त्यामुळे दिनांक १०.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये उक्त दिनांक २३.०९.२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत दिनांक ०७.०७.२०२३ च्या शासन पत्रान्वये राज्यात पवित्र पोर्टलद्वारे नियमित शिक्षक पदभरती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान होऊ नये म्हणून मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची नियुक्ती करणेत येत आहे. रिक्त पदांवर पवित्र पोर्टलद्वारे नियमित शिक्षक नेमण्याचा शासनाचा मानस आहे. सध्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ चा निकाल प्रसिध्द झाला असून, याआधारे शिक्षक पदभरतीबाबतची पुढील कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय शिक्षण तथा उच्च माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत कर्मचाऱ्यांची भरती प्रलंबित असल्याबाबत

**(१९) १२०३ (१६-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत शिक्षक, शिक्षकेतर तसेच तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती अनेक वर्षांपासून प्रलंबित असून विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संख्या अपुरी असल्याने विद्यार्थ्यांचे कार्यालयीन अभिलेख ठेवणे तसेच शाळा, महाविद्यालयांच्या स्वच्छतेबाबत अनेक प्रश्न निर्माण होत असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शालेय शिक्षण तथा उच्च माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत शिक्षकेतर तसेच तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक

नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

मा.न्यायालयाने शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८.०५.२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर रिक्त पदांचा आढावा घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाल्यानंतर शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरतीबाबत निर्णय घेतला जाईल तोपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षकेत्तर भरती करण्यात येऊ नये, असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार याबाबत यथोचित निर्णय होऊन सदरची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोकरदन (जि.जालना) होणाऱ्या अनियमित पाणी पुरवठयामुळे पाणी पट्टी माफ करणेबाबत

**(२०) १२१२ (०१-०५-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) नगरपरिषदेने कोरोना काळात तसेच पाणी टंचाईच्या काळात नियमित पाणीपुरवठाच केलेला नसल्याने सन २०२० ते २०२५ या काळातील पाणीपट्टी नागरिकांना माफ करण्यात यावी अशी मागणी विविध स्थानिक संघटनामार्फत नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी यांना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळामध्ये लॉकडाऊन असल्यामुळे नागरिकांना कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नसल्याने पाणीपट्टी तसेच नगर परिषदेचे इतर कर भरता आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणीटंचाई असल्यामुळे लॉक डाऊन नंतर नगरपरिषदेने पाणीपुरवठा केलेलाच नाही क्वचितच दोन महिन्यातून एखाद्या वेळेस पाणी नळाला सोडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

अशा आशयाचे लेखी निवेदन भोकरदन नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे.

(२) शहरातील बऱ्याच नागरिकांकडून कोरोना काळातील पाणीपट्टी, मालमत्ता कर, जागा भाडे व गाळे भाडे भरणा करण्यात येत आहे.

(३) कोरोना काळामध्ये लॉकडाऊन नंतर नगरपरिषदेकडून टॅंकरव्दारे १०-१५ दिवसआड पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(४) भोकरदन शहर पाणीपुरवठा योजनेंतर्गत कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांचे बिगर सिंचन पाणी उपसाबाबतचे माहे डिसेंबर, २०२४ अखेर रु.६०.४४ लक्ष व महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, जालना यांचे मौजे हाऊस वरील दानापूर येथील पंप रु.७४,६२,१७१/- व जलशुद्धीकरण केंद्र येथील रु.८४,९५,५९३/- व जुन्या पाणीपुरवठा योजनेचे रु.३,५८,१९९/- इतके दायित्व निर्माण झाले असून अनुक्रमे जलसंपदा विभाग व उर्जा विभागास कोरोना काळ व पाणी टंचाई काळातील दायित्व माफ करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची नगरपरिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील दिघी पुणे महामार्गासाठी भूसंपादन झालेल्या सर्व शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(२१) १२२६ (२८-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील राजापुरी खाडीवर विकसित होत असलेल्या दिघी पोर्टला जोडणारा दिघी पुणे महामार्ग मसळा तालुक्यातील सकलप आणि तोंडसूर या बायपास महामार्गावरून जात असून हा रस्ता पूर्ण होऊनही येथील शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नसल्याने या शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिघी पुणे महामार्गासाठी भूसंपादन झालेल्या सर्व शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०१-२०२६) :** (१) व (२) रायगड जिल्ह्यातील राजापुरी खाडीवर विकसित होत असलेल्या दिघी पोर्टला जोडणारा दिघी पुणे महामार्गासाठी मसळा तालुक्यातील मौजे सकलप येथील जमीन थेट खरेदी पध्दतीने संपादित करुन भूधारकाला मोबदला अदा करण्यात आला आहे. मौजे तोंडसुरे येथील शेतकऱ्यांकडून आंदोलनाबाबत इशारा दिल्याचे निदर्शनास आले नाही.

दरम्यान मौजे तोंडसुरे येथील काही खातेदारांना मोबदला भूमीराशी पोर्टलद्वारे अदा केला असुन काही खातेदारांच्या वारसांमध्ये अंतर्गत मतभेद, वारस नोंदी अशा बाबी निदर्शनास आल्याने सदर मुद्दे निकाली निघताच मोबदला वाटप करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## दावोस येथील जागतिक आर्थिक फोरम परिषदेमध्ये सामंजस्य करार केलेल्या उद्योगांकडून प्रत्यक्ष गुंतवणूक करून घेण्याबाबत

**(२२) १२७० (२८-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावोस येथील जागतिक आर्थिक फोरम परिषदेमध्ये सन २०१९ ते २०२५ या काळात वर्षनिहाय झालेल्या सामंजस्य करारानुसार किती गुंतवणूक करण्यात येणार होती व त्यापैकी वर्षनिहाय प्रत्यक्षात किती गुंतवणूक झाली व या गुंतवणुकीमुळे वर्ष निहाय किती लोकांना रोजगार मिळाला,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२५ मध्ये आयोजित जागतिक आर्थिक फोरम परिषदेत मा. मुख्यमंत्री, मा. उद्योगमंत्री यांच्या उपस्थितीत जवळपास रु. १५.९५ लाख रोजगार क्षमता निर्माण करू शकणारे रु. १५.७० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे ६१ सामंजस्य करार केले असून उपरोक्त सामंजस्य करार करणाऱ्या कंपन्यांपैकी किती भारताबाहेरील तर किती कंपन्या भारतातील किंवा महाराष्ट्रातील आहेत, याचा गुंतवणुकीसह तपशील काय आहे तसेच, सदर गुंतवणूक कोणकोणत्या उद्योगक्षेत्रात होणार आहे,

(३) असल्यास, या सामंजस्य करारानुसार किती कालावधीत हे उद्योगधंदे राज्यात सुरु होणार आहेत,

(४) असल्यास, मा.उद्योगमंत्री यांनी माहे जुलै, २०२४ मध्ये दावोस जागतिक परिषदेत झालेल्या सामंजस्य करार व प्रत्यक्ष गुंतवणुकीत रुपांतरीत झालेले करार यासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा केली असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, आतापर्यंत या परिषदेत केलेल्या सामंजस्य करारापैकी किती उद्योगांची प्रत्यक्षात राज्यात निर्मिती झाली आहे, तसेच, सन २०१९ ते २०२४ या काळात सामंजस्य करार केलेल्या उद्योगांकडून प्रत्यक्ष गुंतवणूक करून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (३०-०१-२०२६) :** (१) सन २०१९ मध्ये जागतिक आर्थिक परिषदेत कोणतेही सामंजस्य करार करण्यात आले नाहीत. तसेच राज्यात सन २०२० व २०२१ मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभुमीमुळे जागतिक आर्थिक परिषदेमध्ये सहभाग घेण्यात आलेला नाही.

सन २०२२,२०२३ व २०२४ मध्ये परिषदेत झालेल्या सामंजस्य करार करण्यात आलेल्या प्रकल्पांना/कंपन्याना अनुक्रमे ९२%, ६३% व ८३% प्रमाणात भूखंड वाटप करण्यात आले आहेत. जागतिक आर्थिक परिषदेमध्ये सामंजस्य करार करण्यात आलेले प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्प्यावर कार्यरत आहेत.

तसेच जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मधील उद्योग विभागांशी संबंधित २५ कंपन्याना शासन स्तरावरून मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने देकारपत्र देण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पांना जमीन वाटपाची प्रक्रिया विविध टप्प्यांवर आहेत.

(२) दावोस, स्वित्झर्लंड येथील जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मध्ये राज्य शासनामार्फत (उद्योग विभाग, मुंबई महानगर विकास प्राधिकरण-एमएमआरडीए आणि शहरे आणि औद्योगिक विकास महामंडळ, सिडको) ६३ सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

या सामंजस्य करारातून राज्यात आगामी कालावधीत रूपये १५,७२,६५४ कोटी गुंतवणूक व त्याद्वारे
रु. १५,९५,९६० इतका प्रत्यक्ष+अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. ६३ सामंजस्य करारांपैकी उद्योग विभागाचे ५१ सामंजस्य करार आहेत.

सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्याच्या उद्योजकांचा समावेश आहे.

(३) राज्य शासनामार्फत सामंजस्य करार करण्यात आलेले प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर कार्यरत असून, कोणत्याही औद्योगिक गुंतवणुकीसाठी/ प्रकल्पातून उत्पादन सुरू होण्यासाठी किमान ३ ते ५ वर्षांचा कालावधी लागतो.

(४) व (५) राज्य शासनामार्फत सामंजस्य करार करण्यात आलेल्या प्रकल्पांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक विकास महामंडळामार्फत रस्ते, वीज, पाणी, मल:निसारण इत्यादी पायाभूत सुविधांनी युक्त असे विकसित भूखंड रास्त दराने पुरविले जातात.

तसेच नवीन उद्योग सुरू करण्यासाठी भूखंड वाटप प्रक्रिया संपूर्ण:त संगणीकृत असून नवीन उद्योगांना देण्यात येणाऱ्या सर्व परवानग्या महामंडळाच्या एक खिडकी प्रणालीद्वारे विशिष्ट मुदतीमध्ये उपलब्ध करून दिल्या जातात.

सामंजस्य करार करण्यात आलेल्या प्रकल्पांना/उद्योगांना राज्य शासनाच्या अखत्यारीतील सर्व परवानग्या "मैत्री" या एक खिडकी प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिल्या जातात. सदर प्रकल्पांना उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या मान्यतेने प्रोत्साहने मंजूर करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील महाराष्ट्र राज्य शिक्षक भारती संघटनेचे त्रैवार्षिक अधिवेशनातील शिक्षणसेवक कालावधी कमी करून मानधनात वाढ करणेबाबत

**(२३) १२७३ (०५-०५-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोस (जि.सिंधुदुर्ग) येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक भारती संघटनेचे त्रैवार्षिक अधिवेशनात शिक्षणसेवक कालावधी रद्द करणे किंवा कालावधी कमी करून मानधनात वाढ करणे अशी मागणी ठरावाद्वारे माहे जानेवारी, २०२५ मध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत शिक्षकांना तात्काळ पदवीधर वेतनश्रेणी देण्यात यावी, प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेतंर्गत शाळांना नियमित पोषण आहार पुरवठा करणे, शालेय परिसर व स्वच्छतागृह यांच्या स्वच्छतेसाठी नियमित मदतनीस नियुक्त करणेबाबतही ठराव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५ च्या अधिसूचनेनुसार सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, शालेय वीज बिल शासनामार्फत भरणे, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देणे, सन २००५ पूर्वीच्या शिक्षण सेवकांची जमा असलेली खाती मासिक कपात व सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात वर्ग करणे इत्यादी मागण्याही ठरावाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पदवीधर शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) शिक्षकाने ३ वर्ष समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतरच त्यांना नियमित करण्यात येऊन नियमित वेतनश्रेणी देण्यात येते. सदरचा कालावधी परिविक्षाधीन समजण्यात येतो. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक हा समाधानकारक सेवा करणारा असणे ही बाब सर्वमान्य आहे. तसेच शिक्षण सेवक कालावधी हा सेवानिवृत्ती वेतन व वरिष्ठ वेतनश्रेणी साठी ग्राह्य धरण्यात येतो. परिविक्षाधीन कालावधी रद्द करणे ही मागणी मान्य करणे उचित होणार नाही

शासन निर्णय दिनांक २७.०६.२०२२ नुसार राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वी वर्गावर नियुक्त शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने अभ्यास समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास अभिप्राय सादर केले आहेत. याबाबत शासनाचा वेतनावर होणारा जास्तीचा खर्च, महसूली तूट, राजकोषिय दायित्व तसेच शासनाने घोषित केलेल्या नवीन योजना यामुळे मोठ्या प्रमाणात येणारा आर्थिक भार याबाबी विचारात घेता सदर प्रस्तावात नमूद केलेला आर्थिक भार सद्यस्थितीत घेणे शक्य नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगोला पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२४) १२८१ (२५-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील सांगोला पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ हा दुपदरी रस्ता असल्याने वाहनांची रहदारी मोठ्या प्रमाणात होत असून अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर महामार्गावर कर्नाटक व महाराष्ट्रातून पंढरपूरला येणाऱ्या वारकऱ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात असून, या महामार्गावर वारीच्या काळात दिंड्याची, वारकऱ्यांची गैरसोय होऊन अनेकदा मोठे अपघात होऊन अनेकांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगोला पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ चौपदरी करण्याची मागणी वारंवार तेथील लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून सांगोला पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ चे चौपदरीकरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयातील सांगोला पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ सी हा पेव्हड शोल्डर सहित दुपदरी (२L+PS) (concrete) रस्ता राष्ट्रीय महामार्ग मंडळाकडे १५.०५.२०२५ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून वर्ग करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखा सोलापूर ग्रामीण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार अपघातांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येत नाही.
(३) हे खरे नाही.

(४) सन २०२३ मध्ये ६९१९ पीसीयु इतकी वाहतूक असून चौपदरीकरणाच्या मानकाप्रमाणे सदर वाहतूक गणना पुरेशी नाही. यास्तव चौपदरीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये वंदे मातरम् हे गीत अनिवार्य करण्याबाबत**

**(२५) १३११ (०५-०५-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दररोज वंदे मातरम् हे गीत अनिवार्य करण्यातबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाच्या विचारार्थ आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गीतातून जागृत होणारा देशाविषयीचा अभिमान व भावना लक्षात घेता वरील सर्व शाळांमध्ये वंदे मातरम् म्हणणे अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१), (२) व (३) अशी कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

तथापि, स्वर्गीय बंकीमचंद्र चट्टोपाध्याय रचित वंदे मातरम् या भारताच्या राष्ट्रगीताच्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ ते दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीदरम्यान राज्यातील सर्व शाळांमध्ये संपूर्ण वंदे मातरम् गीताचे गायन करण्याबाबत व या गीताचा इतिहास सांगणारी प्रदर्शनी शाळांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत शासनाच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने, शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण अधिकारी ( प्राथमिक/ माध्यमिक), शिक्षण निरीक्षक, शिक्षण प्रमुख तसेच प्रशासन अधिकारी यांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये संपूर्ण वंदे मातरम् गीताचे गायन करण्याबाबत व या गीताचा इतिहास सांगणारी प्रदर्शनी शाळांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत निर्देश दिले आहेत.

---

**नागठाणे (ता.पलुस,जि.सांगली) येथील बालगंधर्व स्मारकाबाबत.**

**(२६) १३९० (२३-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागठाणे (ता.पलुस,जि.सांगली) येथे बालगंधर्व स्मारकासाठी तत्कालीन लोकप्रतिनिधी यांनी सन २००४ च्या अर्थसंकल्पात रु. ३ कोटी ४६ लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याशिवाय तत्कालीन पालकमंत्र्यांनी निधी वाढवून दिला असून त्यामुळे या स्मारकाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित कामात फरशी बसविणे, इलेक्ट्रिक व्यवस्था, पाणी व बागबगिचा, पार्किंग इत्यादी व्यवस्था अपूर्ण आहे, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रु. ७ कोटी रुपयाची वाढीव मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या स्मारकासमोर पार्किंगची व्यवस्था करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेची मागणी करण्यात आली आहे, परंतू त्यावरील कार्यवाही अद्याप बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने माहिती व निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन कोणती कार्यवाही केली आहे वा

करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे नागठाणे ता. पलूस जि.सांगली येथे बालगंधर्व स्मारकाचे बांधकाम करण्यासाठी रु. ३,४६,७४,५०५/- इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे.

(३) या संदर्भात रु. ७९५.५६ लक्ष रकमेची वाढीव मागणी करण्यात आली आहे.

(४) नाही.

सदरची जागा ही सार्वजनिक बांधकाम विभागाची नसून, ती जलसंपदा विभागाची आहे. सदर जागेची मोजणी होऊन मोजणी कार्यालयाकडून हद्दी दाखविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

## वसई विरार शहरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असलेबाबत.

**(२७) १४०४ (२५-०४-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिकाक्षेत्राची सन २०११ च्या जणगणनेनुसार रु. १२.२३ लक्ष इतकी लोकसंख्या असून शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार खाजगी प्रवासी तसेच मालवाहू वाहनांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने अस्तित्वातील रेल्वे ओव्हर ब्रिजवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा ताण येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महापालिकाक्षेत्रात वाहतूक कोंडीचा दिवसेंदिवस गंभीर होत असलेला प्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेमार्फत सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९, दिनांक १६.०४.२०१५ अन्वये महापालिकाक्षेत्रातील ४ विविध ठिकाणी रेल्वे ओव्हर ब्रिज बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विरार येथील विराट नगर येथे पूर्व-पश्चिमेस जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज, नालासोपारा येथील उस्वालनगरी येथे पूर्व-पश्चिमेस जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज, नालासोपारा येथील अलकापुरी येथे पूर्व-पश्चिमेस जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज तसेच वसई येथील उमेळमान येथे पूर्व-पश्चिमेस जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज या प्रमुख ४ रेल्वे ओव्हर ब्रिजचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणात होत असलेली वाहतूक कोंडी पाहता सदरील ४ रेल्वे ओव्हर ब्रिजला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे

(२) व (३) होय, हे खरे

वसई-विरार महानगरपालिकेमार्फत सर्वसाधारण ठराव क्र. १३, दिनांक १६.०४.२०२५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील विराटनगर, ओस्वाल नगरी, अलकापुरी, उमेळमान येथील एकूण ४ ठिकाणी रेल्वे उड्डाणपुल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (Extd. MUIP) अंतर्गत उभारणीचा प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत.

(४) व (५) सदर प्रस्तावांकरीता प्राधिकरणाची प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत सदर ४ रेल्वे उड्डाणपुल बांधकामांकरीता रु. २८८.४८ कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक या

प्राप्त झाले आहे.

रेल्वे उड्डाणपुलाची मार्गिका अंतिम केल्यानंतर त्या अनुषंगाने करावे लागणारे भू-संपादन, मार्गिकत बाधित होणारे प्रकल्पग्रस्त व त्यांचे पुनर्वसन, सेवा वाहिन्या असल्यास त्यांचे स्थलांतरण, संकल्प चित्र तयार करत असतांना आर्थिक व्यवहार्यता, बांधकाम करत असताना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी त्याचप्रमाणे सदर मार्गिकत रेल्वे विभागाचे भविष्यात प्रस्तावित असलेले विकास प्रकल्प इत्यादी अत्यंत महत्वाचे बाबींकरीता रेल्वे विभागाकडून सामान्य आखणी रेखांकनाची (GAD) मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तावांवर पश्चिम रेल्वेच्या संबंधीत विभागाकडे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून सामान्य आखणी रेखांकन संबंधीत मंजुरी मिळवण्याकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच रेल्वे संबंधीत आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त झाल्यानंतर तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामांस सुरुवात करण्यात येईल.

---

**मालाड (पश्चिम), मुंबई या इनफिनिटी मॉल, एव्हरशाईन नगर रस्त्यावरील पुलांचे काम सुरु करण्याबाबत.**

**(२८) १४३० (०१-०५-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रियॉन इंटरनॅशनल स्कूल ते बॅक रोड, इनफिनिटी मॉल, एव्हरशाईन नगर, मालाड (पश्चिम), मुंबई या रस्त्यावरील पुलास मेरी टाईम बोर्डाने (MMB) तत्वत: दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता मिळाली असूनही अद्याप पूलाच्या कामास सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलांचे काम तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे,

सदर प्रकल्पास मेरी टाईम बोर्डाने (MMB) यांची दिनांक ०४ जानेवारी, २०२२ तत्वतः मंजुरी प्राप्त झाली आहे..

सदरहु रस्ता करिता मुंबई महानगरपालिकेने १८.३० मी रूंदीची मार्ग रेषा मंजूर केली आहे व भुसंपादन करण्याकरीता जमीन मालकांना नोटीस देण्यात आलेली आहे.

मे. सरगम स्थापत्य यांनी सदर प्रकरणी जमीनीचे भुसंपादन व मंजूर रस्ता रेषेच्या विरोधात रिट याचिका क्र. २९७२/२०२५ अन्वये दाखल केली असून मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी सदर प्रकरणी स्टेटस को (Status Quo) राखण्याचे अंतरीम आदेश दिले आहे.

(२) प्रस्तावित पुलाच्या बांधाकामासाठीची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून सदर निविदेची पॅकेट “अ” व “ब” दिनांक २३.०४.२०२५ रोजी उघडण्यात आले असून सदर निविदेची पॅकेट “अ” व “ब” ची छाननी प्रक्रिया सुरु आहे. सर्व परवानगी /भुसांपादन झाल्यानंतर पूलाचे काम प्रत्यक्ष जागेवर सुरु होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेने अनेक इमारतींना भोगवटा प्रमाण पत्र दिले नसल्याबाबत**

**(२९) १४३१ (२३-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप**

**मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेने स्थापनेपासून आतापर्यंत २६,८७९ एवढया इमारती बांधण्यास परवानगी दिली व त्यापैकी ११,९६७ इमारतीनी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२४ च्या दुसऱ्या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित १४,९१२ इमारतींना भोगवटा प्रमाण पत्र न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण २६९०९ एवढ्या इमारती बांधण्यास परवानगी दिली आहे. त्यापैकी १२०२४ इतक्या इमारतींना माहे ऑगस्ट, २०२४ पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण १३५०९ प्रकरणांमध्ये काही भोगवटा प्रमाणपत्राकरिता प्राप्त झालेले प्रस्ताव अपूर्ण आहेत. काही प्रस्तावामध्ये सीआरझेड ना-हरकत, भारतीय विमानतळ प्राधिकरणाचा ना-हरकत दाखला, पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला, न्यायप्रविष्ठ प्रकरणे तसेच, वाढीव बांधकाम व दुरूस्त्या (Addition / Alteration / Repairing) केलेल्या इमारती वगळता व परिपूर्ण प्रस्ताव सादर न केल्याने भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाहीत.
(३) नगर विकास विभाग दिनांक १८.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे नवी मुंबई महानगरपालिकेस भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्राप्त प्रकरणे विहीत प्राधिकरणांची मंजुरी / मान्यता घेवून त्यांची तपासणी करुन जी निकषात बसतील त्यांना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करण्याबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला शिवणी विमानतळाच्या विकास प्रस्तावाबाबत

**(३०) १५२१ (०१-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शिवणी विमानतळाच्या विकास /विस्ताराबाबतची सदयस्थिती काय आहे,
(२) असल्यास, अकोला शिवणी विमानतळाकरिता लागण्याऱ्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्णकरण्यात येऊन यासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादनाच्या कार्यवाहीकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१२-२०२५) :** (१), (२) व (३) अकोला विमानतळाचा विकास / विस्तार करण्यासाठी २२.२४ हे.आर. क्षेत्राचे भूसंपादन करण्याकरिता रू.२०८.७६ कोटी इतक्या खर्चास दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवणेबाबत

**(३१) १६१६ (२५-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टॉमटॉम या डॅनिश संस्थेच्या ट्रॅफिक इंडेक्सच्या अहवालानुसार वाहतूक कोंडीच्या बाबतीत पुणे शहर जगात चौथ्या क्रमांकावर असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त संस्थेच्या अहवालानुसार पुणे शहरात केवळ १० किलोमीटर अंतर कापण्यासाठी ३३ मिनिटे २२ सेकंदांचा अवधी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) पुणे महानगरपालिका व पुणे वाहतूक पोलिस यांच्यामार्फत अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरण करणे व नवीन रस्ते निर्माण करणे, वाहतूक सिग्नल यंत्रणा बसविणे, एकेरी वाहतूक पर्याय वापरणे तसेच रस्त्यावरील पार्किंगला प्रतिबंध करणे, पुणे शहरासाठी सर्व समावेशक वाहतूक आराखडा तयार करणे, मेट्रो प्रकल्प पूर्ण करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

---

## बोरिवली सिध्दार्थनगर येथील माता बालक रुग्णालयात वरिष्ठ बालरोग तंत्रज्ञ व निवासी डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत

**(३२) १७९० (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर बोरिवली–पूर्व, सिध्दार्थ नगर येथील माता बालक रुग्णालयात वरिष्ठ बालरोग तंत्रज्ञ अधिक निवासी डॉक्टर नसल्यामुळे तेथील महिलांची प्रसूती तसेच गर्भ पिशवीची शस्त्रक्रिया देखील केली जात नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ बालरोग तंत्रज्ञ व निवासी डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई उपनगर बोरिवली - पूर्व येथील सिध्दार्थ नगर येथील माता बालक रुग्णालयामध्ये एकूण ३ बालरोग तज्ञांची सकाळी ९ ते ४ वेळेत नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच एक निवासी वैद्यकीय अधिकारी यांची बालरोग विभागात पुर्ण वेळ नियुक्ती करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त इमर्जन्सी बालरोग रुग्ण तपासणीकरीता पॅनलवरील बालरोग तज्ञ (On call paediatrician) उपलब्ध करण्यात आले आहेत.

सदर रुग्णालयामध्ये महिलांची प्रसुती नैसर्गिक व गर्भ पिशवीची शस्त्रक्रियेद्वारे (सिझरियन सेक्शन) करण्यात येते.

सन २०२४ मध्ये २४९ नैसर्गिक प्रसुती आणि १६० प्रसुती पिशवीची शस्त्रक्रियेद्वारे (सिझरियन सेक्शन) करण्यात आलेल्या आहेत तसेच सन २०२५ मध्ये माहे जानेवारी, २०२५ ते माहे एप्रिल, २०२५ या कालावधीमध्ये ८४ नैसर्गिक प्रसुती आणि ८५ प्रसुती पिशवीची शस्त्रक्रियेद्वारे (सिझरियन सेक्शन) करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) मुंबई या ठिकाणी वाहनांच्या पार्किंगसाठी वाहनतळ निर्माण करण्याबाबत**

**(३३) १७९२ (२३-०४-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) मुंबई या ठिकाणी वाहनांच्या पार्किंगची समस्या नेहमी उदभवत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने वाहनतळ निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये संबधित विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) ठाकूर व्हिलेज, वॉईसराय सवाना इमारती जवळ, १२० फुट रोड व एव्हरशाईन रोड ठाकुर व्हिलेज येथे सुविधा वाहनतळ खाजगी विकासकाकडून महानगरपालिकेस हस्तांतरीत झाले असून सध्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर "पे आणि पार्क" योजना सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवापूर (जि.नंदुरबार) नगर परिषद हद्दीतील बांधण्यात आलेल्या रस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३४) १८२१ (२३-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) नगर परिषद हद्दीतील नवापूर शहरामधे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या रस्ताची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते बांधकामाची कामे करताना करण्यात आलेल्या डांबरीकरणाचे काम हे न केल्यासारखेच असल्यामुळे नवापूर शहरातील जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही,

सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण ६ रस्त्याची कामे करण्यात आली आहे. सदर कामाचे शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे यांच्यामार्फत त्रयस्त तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आले असून, सदर कामे समाधानकारक व सकारात्मक असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) सदर प्रकरणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने नंदूरबार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्याधिकारी, नवापूर नगरपरिषद यांच्याकडून प्राथमिक चौकशी अहवाल मागविण्यात आला. सदर प्राथमिक चौकशी अहवालानुसार नगरपरिषदेने केलेली कामे समाधानकारक असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मनमाड जवळील (जि.नाशिक) वागदर्डी येथे रेल्वे प्रशासनाने तयार केलेल्या भुयारी मार्गाची उंची वाढविण्याबाबत

**(३५) १८३४ (०८-०५-२०२५). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाडजवळील (जि.नाशिक) वागदर्डी येथे रेल्वे प्रशासनाने जुना मार्ग बंद करून त्याजागी तयार केलेल्या नवीन भुयारी मार्गाजवळ मोठमोठे खड्डे, त्यात साचलेले पाणी व चिखलामुळे पंचक्रोशीतील शेकडो विद्यार्थ्यांना शाळेत येण्या-जाण्यासाठी दररोज रेल्वेरूळ ओलाडून जीव धोक्यात घालावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी असलेला यापूर्वीचा भुयारी मार्ग मोठा असताना केवळ रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे स्थानिकांसाठी लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाची उंची ३ फुटांवर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून सदर मार्गाचे खोलीकरण करून उंची वाढविण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२८-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर भूयारी मार्ग हा जल निकासी मार्ग (Drainage Pathway) आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिक्षक व डॉक्टरांची रिक्त पदे भरणेबाबत

**(३६) १९३५ (२८-०४-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एक हजारांहून अधिक शिक्षकांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने डॉक्टर ऑफ मेडिसिन (एमडी) आणि मास्टर ऑफ सर्जरी (एमएस) करणाऱ्या सहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या (डॉक्टर) अभ्यासावर परिणाम होत असल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये तातडीने पात्र शिक्षकांची नियुक्ती करावी अशी विनंती मार्डने केंद्रीय वैद्यकीय मंत्र्यांकडे केली असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकत्याच जाहीर झालेल्या सन २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात वैद्यकीय महाविद्यालयांत विद्यार्थ्यांच्या ७५ हजार जागा वाढविणार असल्याची घोषणा मा. केंद्रीय अर्थमंत्री यांनी केली असल्याने आगामी काळात विद्यार्थी संख्या वाढल्यास प्राध्यापकांच्या रिक्त पदांचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालयामधील डॉक्टरांची अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णालय प्रशासन व रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील १७ वैद्यकीय महाविद्यालयांमधील शिक्षक व डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) मार्डने केंद्रीय वैद्यकीय मंत्र्यांकडे वैद्यकीय शिक्षकांची नियुक्ती करणेबाबत विनंती केली असण्याची शक्यता आहे. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी शिक्षकांची शिफारस करण्यात येत असून त्यांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित रिक्त पदांवर देखील लवकरच उमेदवार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संख्येत शैक्षणिक वर्षे २०२५-२६ मध्ये वाढ झालेली नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कार्यरत अध्यापक / डॉक्टर्स यांच्यामार्फत रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर उपचार करण्यात येतात. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये Medical Commission च्या निकषांनुसार अध्यापक उपलब्ध करून विद्यार्थी व रुग्णहित जपण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील राहिले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्धापूर आणि मुदखेड (जि.नांदेड) नगर परिषद क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसाठी म्हाडाची जागा मिळणेबाबत

**(३७) २१६५ (२४-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्धापूर आणि मुदखेड (जि.नांदेड) नगर परिषद क्षेत्रामध्ये म्हाडाव्दारे समाजातील अल्प व अत्यल्प उत्पन्न घटकांसाठी बांधण्यात आलेल्या घराचे अद्यापही वाटप न झाल्यामुळे वापरा अभावी मोडकळीस आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी सदरची जागा मिळावी अशी मागणी अर्धापूर आणि मुदखेड नगरपरिषदांकडून म्हाडाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन मा. गृहनिर्माण मंत्र्यांनी सदर जागा संबंधीत नगरपालिकांना विनामुल्य हस्तांतरीत करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागा संबंधीत नगरपालिकांना विनामुल्य हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही.
(४) अर्धापूर नगरपरिषद व मुदखेड नगरपरिषद यांनी जमिनीच्या विकासावर व रहिवाशी गाळे बांधण्यासाठी खर्च झालेली रक्कम अदा केल्यास त्यांना जमिनीचे हस्तांतरण करणे शक्य असल्याचे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने संबंधित नगरपालिकेला कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विज्ञान केंद्रामार्फत विविध योजनांमधून शेतकऱ्यांना पुरविल्या

**जाणाऱ्या निविष्ठा व्यवहाराची चौकशी थांबविण्याचे आदेश दिल्याबाबत**

**(३८) २२५६ (२६-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विज्ञान केंद्रामार्फत कृषी खात्यातील विविध योजनांमधून शेतकऱ्यांना पुरविल्या जाणाऱ्या निविष्ठा व्यवहाराची चौकशी थांबविण्याचे शासनाने दिलेले आदेश रद्द करण्यात ठेकेदारांना यश आल्याचे दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) धोरण स्वीकारल्यापासून ठेकेदार संघटनानी बंद झालेला कृषी उद्योगाचा पुरवठा कापूस व सोयाबीन मुल्यसाखळीच्या निमित्ताने पूर्ववत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत शासनास डीबीटी लागू करु नका असा स्वतंत्र आदेश जारी करण्याबाबत ठेकेदार संघटनेसह कृषी खात्याच्या एक उच्चपदस्थ अधिकारी सामील असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विज्ञान केंद्रामार्फत सुरु असलेला निकृष्ट निविष्ठांचा पुरवठा व त्यातुन मिळणारे अनुदान याबाबत मतभेद सुरु असल्याने कृषी आयुक्तालयाकडे पुरवठ्यानिशी तक्रार केल्यानंतर दिनांक २१ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास चौकशीचे आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही. तथापि, याबाबतची बातमी माध्यमाद्वारे दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली होती.

(२) व (३) राज्यात कृषी साहित्य खरेदीसाठी शासन निर्णय दिनांक १९.४.२०१७ नुसार सुरु असलेली थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना शासनाने बंद केलेली नाही.

सन २०२३-२४ मध्ये राज्य पुरस्कृत कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेतील कार्यक्रमांतर्गत दिनांक १२ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयानुसार बाब बदलास मान्यता देण्यात आली होती.

सदर योजनेअंतर्गत सन २०२३-२४ च्या कार्यक्रमातील समाविष्ट बाबींच्या अंमलबजावणीसाठी एक वेळची विशेष बाब म्हणून दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता दिली होती.

(४), (५) व (६) होय, याबाबत दिनांक १८ जून, २०२४ रोजी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त (कृषी) यांनी दिनांक २१ जून, २०२४ रोजी दक्षता पथक, कृषी आयुक्तालय, पुणे यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने दक्षता पथकामार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

**बीड शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवणे बाबत**

**(३९) २२६० (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढविणे व सुशोभिकरण करणे तसेच पुतळ्याच्या चबुतऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात यावे तसेच त्यासाठी वास्तुविशारद (Architect) तात्काळ नेमण्यात यावा, अशी जिल्ह्यातील व शहरातील नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासक, नगरपरिषद, बीड, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांचे स्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत माहे फेब्रुवारी, २०२२ पासून आजतागायत अनेकदा बैठकी घेण्यात आलेल्या असून त्यानंतर परिषदेकडून

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे माहे मार्च, २०२३ मध्ये त्यासंदर्भातील प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालीन बीड जिल्हा पालकमंत्री व मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी सदर प्रस्तावावर सकारात्मक कार्यवाही करण्याबाबत माहे मे, २०२२ मध्ये जिल्हाधिकारी, बीड यांना आदेशित करणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड तसेच प्रशासक, मुख्याधिकारी नगरपरिषद, बीड यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत तातडीने चौकशी करुन सदर प्रस्तावानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवून सुशोभिकरण करण्याची तसेच चबुतऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्यासाठी वास्तुविशारद (Architecture) नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) बीड नगरपरिषदेने सदर कामाकरीता वास्तुविशारद (Architecture) नियुक्त करण्याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून, कमी दराचे निविदाकार एम.के.के. कन्सल्टंट्स प्रा. लि., बीड यांना दिनांक २२.०२.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. तद्नंतर, मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पुतळ्याची उंची वाढविणे व सुशोभिकरण करण्याच्या कामासाठी संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन घेण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार, नगरपरिषदेने दिनांक २५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या चबुतऱ्याचे संरचनात्मक लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले. त्यानुसार संरचनात्मक लेखापरिक्षण करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने सी.एन.कुऱ्हे स्ट्रक्चरल इंजिनिअर, नांदेड यांची दिनांक २५.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली आहे.

सदरचा संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होताच अंदाजपत्रक तयार करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पुतळा समितीसमोर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अनेक जिल्ह्यात खत विक्रेत्यांकडून युरिया खत लिंकिंग केल्याशिवाय शेतकऱ्यांना देत नसल्याबाबत

**(४०) २२७८ (२५-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात विशेषत: माढा (जि.सोलापूर), अहिल्यानगर व भंडारा येथे कृत्रिमरित्या खत टंचाई करुन युरिया खत लिंकिंगने होलसेलमार्फत विकली जात असल्यामुळे शेतकऱ्यांसह दुकानदारानाही बळजबरीने इतर खत खरेदी करावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ऊस, कांदा, गहू, हरभरा आदी पिकांसाठी बाजारात खतांची मोठी मागणी असून बाजारात १०:२६:२६, १८:४६:००, १२:३२:१६ आदी रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांना अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खतटंचाई व लिंकिंगमुळे काही कंपन्याना मागणी असलेल्या मुख्य खतांसोबत अनावश्यक वा दुय्यम उत्पादने विकण्यासाठी कृत्रिम खतटंचाई निर्माण करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत खप नसलेली खते, बि-बियाणे घेण्याची सक्ती केल्याने दुकानदारांचा तोटा होऊन बाजारात बनावट खतांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याच्या तक्रारी येत असून कृत्रिम खतटंचाई व लिंकिंगमुळे शेतकरी, दुकानदार व कृषी विभागही हतबल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात मा.कृषी मंत्री, यांनी युरिया खत लिंकिंग बंद करणे तसेच लिंकिंग करणाऱ्या दुकानदारावर कारवाई करण्यासाठी भ्रमणध्वनी जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या असता तालुका कृषी अधिकारी यांनी संबंधित दुकानदारावर व खत विक्रेत्यांवर कारवाई न करता त्यांना पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, धान पिकाकरिता शेतकऱ्यांकडून युरिया खताची मोठ्या प्रमाणात मागणी होत असून खत विक्री करणाऱ्या कंपनीने कृषी केंद्र चालकांना ११ मेट्रिक टन युरिया खतासोबत २२ हजारांची लिंकिंग करण्याचा दबाव टाकत असल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) तसेच, लिकिंग खरेदी न केल्यास युरिया खत मिळणार नाही अशी धमकी खत कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी कृषी केंद्र चालकांना देत आहेत तसेच युरिया खत खरेदी करण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांनाही युरिया खताच्या मोबदल्यात लिकिंग खरेदी करण्यास मागे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता खत लिंकिंग करणाऱ्या खत विक्रेत्यावर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१५-१२-२०२५) :** (१) नाही
(२) नाही
(३) सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील मे.रेवणसिद्धी ॲग्रो एजन्सी या कृषि केंद्राच्या गोदामावर जिल्हास्तरीय भरारी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये बोगस खत आढळून आले. त्यानुसार संबंधीतांवर टेंभूर्णा पोलीस स्थानकामध्ये विहीत कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच भंडारा जिल्हामध्ये बनावट खतांची विक्री केल्यासंदर्भात मेसर्स कृषि चिकित्सालय आणि कृषि तंत्रज्ञान माहीती केंद्र, लाखणी यांचेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.
(४) नाही
(५) नाही
(६) नाही
(७) नाही
(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील शक्ती पीठ महामार्गाबाबत.**

**(४१) २३२१ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील शक्ती पीठ महामार्गाला लातूर व बीड, धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान विविध आंदोलने करुन विरोध केला, हे खरे आहे काय,
(२) तसेच पवनार ते पत्रादेवी असा शक्तिपीठ महामार्ग शासनाने घोषित केला असून धाराशीव जिल्हयातील सर्वात सूपिक असलेल्या व बाराही महिने सिंचनाखाली असलेले १९ गावे बाधीत होणार असल्याने शेतकरी भुमीहीन होऊन बेरोजगारीही वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धाराशीव जिल्हयातुन होऊन घातलेला शिक्तिपीठ महामार्ग रद्द करावा किंवा पर्यायांचा विचार करावा म्हणून दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास संघर्ष समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी धाराशीव यांना रस्तारोको करुन सनदशीर मार्गाने निवेदन दिलेले असून शक्तीपीठ महामार्गाच्या दिनांक ७ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेला अनेक शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन तसेच, प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येत आहे व सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, यादृष्टीने उचित कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कातुर्ली (ता. पवनी जि. भंडारा) येथील तलावाच्या गेटमधून पाणी लिकेजमुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याबाबत.**

**(४२) २३५३ (२८-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील कातूर्ली तलावाच्या गेटमधून होत असलेल्या पाणी गळतीमुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गेटमधून होणारी पाणी गळती बंद करण्यात यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल असे शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये निवेदन दि़ल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणी गळती बंद करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२४-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
कातुर्ली तलावाच्या मुख्य विमोचकातून अल्प प्रमाणात गळती असून त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आढळून आलेले नाही.
(२) होय, हे खरे आहे.
दिनांक १९.११.२०२४ रोजीच्या निवेदनाद्वारे स्थानिक शेतकऱ्यांनी गळती थांबविण्याबाबत विनंती केली आहे.
(३) नाही.
कातुर्ली लपा तलाव (ता. पवनी जि. भंडारा) या सिंचन प्रकल्पाची दिनांक ०५.१२.२०२४ रोजी मौका चौकशी केली असता, तलावाच्या मुख्य विमोचकातून (HR गेट) अल्प प्रमाणात पाण्याची गळती होऊन ते पाणी कालव्यात साचल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आढळून आलेले नाही.
(४) होय.
कातुर्ली तलावाचे गेट मधुन लिकेज होऊन कालव्यात साचलेले पाणी विमोचकापासून ५६० मी. वर असलेल्या सायफन मधून नाल्याला वळविण्यात आले असून लिकेज होणाऱ्या पाण्याचे समस्याचे निराकरण करण्यात आले आहे.
तसेच सदर गेटच्या दुरूस्तीचे काम सन २०२५-२६ च्या बिगर सिंचन/सिंचन प्रापणसूची मध्ये समाविष्ट करून दुरूस्तीचे काम पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वनक्षेत्र वाढविणेबाबत

**(४३) २४२० (२६-०४-२०२५). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही जिल्ह्यात वनक्षेत्र कमी झाले असून केवळ १६.५३ टक्के वनक्षेत्र शिल्लक राहिल्याचे तसेच विशेषत: पुणे, वाशिम व पश्चिम घाटात वनक्षेत्र कमी शिल्लक राहिल्याची माहिती राष्ट्रीय वन अहवाल, २०२३ मधून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहर व जिल्ह्याच्या चारही बाजूला अव्याहात सुरू असणारी विकास कामे आणि रस्त्यांचा विस्तार यामुळे सदर वनाछादित क्षेत्र कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात काही वर्षांपूर्वी वनक्षेत्र २०.१% असताना विविध विकास कामे व वृक्षतोडीमुळे मुंबईसह १८ जिल्ह्यांतील वनांचे क्षेत्र कमी होत असून मागील दहा वर्षात राज्याचे वनक्षेत्र केवळ दीड टक्क्यांनी वाढले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनक्षेत्रात होणारी घट व त्यामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासंदर्भात तसेच राज्यातील वनक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२०-०८-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे,

वनक्षेत्र (Forest Area) आणि वनाच्छादन (Forest Cover) या शब्दांची व्याख्या वेगवेगळी आहे. वार्षिक प्रशासन अहवाल-२०२३ नुसार राज्याचे एकूण वनक्षेत्र (Forest Area) ६१,९९२.७६ चौ.कि.मी. असून ते भौगोलिक क्षेत्राच्या २०.१५ टक्के असून सदर वनक्षेत्रात सन २०२१ च्या तुलनेत (६१९९१.८९ कि.चौ.मी.) किंचित वाढ झाली आहे. तसेच वार्षिक प्रशासन अहवाल-२०२३ नुसार राज्याचे वनाच्छादन (Forest Cover) हे १६.५३ टक्के असून सन २०२१ (१६.५१ टक्के) च्या तुलनेत वाढलेले दिसून येते.

वार्षिक प्रशासन अहवाल २०२०-२१ व २०२३-२४ च्या तुलनात्मक तक्त्यानुसार पुणे, वाशिम तसेच पश्चिम घाटाचे वनक्षेत्र (Forest Area) हे खालीलप्रमाणे आहे : -

| जिल्हा | पुणे | वाशिम | पश्चिम घाट |
|---|---|---|---|
| वनक्षेत्र (चौ. किमी.) २०२१ | २२८४.९१ | ४३४.१६ | १९९६०.३७ |
| वनक्षेत्र (चौ. किमी.) २०२३ | २२८९.७६ | ४३४.१९ | १९९५६.१ |
| शेरा | ४.८५ चौ.कि.मी. ची | ०.०३ चौ.कि.मी. ची | -३.९६ चौ. कि.मी. घट |

| | | | |
|---|---|---|---|
| | वाढ | वाढ. | आहे |

(२) हे खरे नाही,

भारत वन स्थिती अहवाल, २०२१ व २०२३ च्या तुलनात्मक तक्त्यानुसार पुणे जिल्ह्याचे वनाच्छादनात (Forest Cover) झालेल्या वाढीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे : -

| जिल्हा | पुणे |
|---|---|
| वर्ष वनाच्छादन (चौ. किमी.) २०२१ | १७१६.४९ |
| वर्ष वनाच्छादन (चौ. किमी.)२०२३ | १७१६.९५ |
| शेरा | ०.४६ चौ. किमी वाढ झालेली आहे. |

(३) हे खरे नाही,

वार्षिक प्रशासन अहवाल, २०२३ नुसार राज्याचे एकूण वनक्षेत्र (Forest Area) ६१९९२.७६ चौ.कि.मी. असून ते भौगोलिक क्षेत्राच्या २०.१५ टक्के आहे.

भारत वन स्थिती अहवाल, २०२३ नुसार मुंबईसह १८ जिल्हयांचे वनक्षेत्र (Forest Area) कमी झालेले नसून सन २०२१ च्या तुलनेत राज्यातील मुंबईसह २५ जिल्हयांतील वनाच्छादन (Forest Cover) कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, राज्यातील एकूण वनाच्छादनात (Forest Cover) किंचीत वाढ झाली आहे.

वार्षिक प्रशासन अहवाल २०१३-१४ व २०२३-२४ च्या तुलनात्मक तक्त्यानुसार मागील १० वर्षात महाराष्ट्राच्या वनक्षेत्रात (Forest Area) वाढ झाली आहे.

| वर्ष | एकूण वनक्षेत्र (चौ. किमी.) |
|---|---|
| २०१३-१४ | ६१५७९.२२ |
| २०२३-२४ | ६१९९२.७६ |

(४) राज्यातील वनक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टिने खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात आली आहे : -

१) वनक्षेत्राभोवती सर्वे व सिमांकन केली जातात.

२) संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांचेमार्फत वनांचे संरक्षण व संवर्धनाची कामे केली जातात.

३) अवनत वनक्षेत्रात रोपवनाची कामे घेतली जातात. तसेच वनक्षेत्राच्या बाहेर वनशेतीच्या माध्यमातुन वृक्षाच्छादन वाढविण्याचा प्रयत्न होत आहे.

४) अवैध चराई, अवैध वृक्षतोड यावर नियंत्रण ठेवण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून वनक्षेत्रात गस्तीचे कामे केली जातात.

५) वनक्षेत्राच्या बाहेर रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड केली जाते.

(५) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात आदिवासींची विशेष पदभरती पूर्ण करुन आदिवासींना न्याय मिळण्याबाबत**

**(४४) २४४३ (२६-०४-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व निमशासकीय सेवेत अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर अवैध जातप्रमाणपत्र दिलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यास सुप्रिम कोर्टाने दिलेल्या आदेश व शासनाच्या शासन निर्णयान्वये कालबध्द पध्दतीने पदभरती करण्याचे ठरविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतू यासंदर्भात अद्यापपर्यंत फक्त १२३ पदे भरण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध जातप्रमाणपत्र दिलेल्या १२५०० आदिवासी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागेवर विशेष भरतीने आदिवासींची पदे भरावयाची होती परंतू उर्वरित आदिवासींच्या पदभरतीची जाहिरात अद्यापपर्यंत जाहिर झाल्याचे निदर्शनास आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींना न्याय मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०२५) :** (१) होय, खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३१४०/२०१८ मध्ये दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये प्रशासकीय विभागांनी सादर केलेल्या माहितीनुसार शासन सेवेत दिनांक १५.०६.१९९५ ते ३१.०८.२०१५ या कालावधीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्त झालेले तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेले १२५२० कर्मचारी असल्याचे नमूद केले आहे. यापैकी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे विशेष मागास प्रवर्गाचे/ अन्य राखीव प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर करून सेवेत राहिलेले कर्मचारी ३१७२ आहेत. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव प्रलंबित असलेल्या, अर्ज सादर न केलेल्या व सेवेतून काढून टाकलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ७४४९ आहे.

शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने / जातवैधता सादर न केल्याने अधिसंख्य पदांवर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रत्यक्षात ६८६० इतकी असल्याचे सर्व प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिसून आले आहे. अशा प्रकारे कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेली १३४३ पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरण्यात आल्याची माहिती विभागांकडून प्राप्त झाली आहे. सरळ सेवेने विहित प्रक्रीयेद्वारे पदभरती करताना इतर राखीव प्रवर्गाप्रमाणेच अनुसूचित जमाती प्रवर्गाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रीया संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निरंतर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कमलापूर (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील शालेय पोषण आहारातील तांदळामध्ये उंदरांच्या व घुशीच्या विष्ठा आढळल्याबाबत**

**(४५) २४७३ (०५-०५-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमलापूर (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील शालेय पोषण आहारातील तांदळामध्ये उंदरांच्या व घुशीच्या विष्ठा दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर बाब सामाजिक कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगोला तालुक्यातील किती शाळांमध्ये सदर शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शालेय पोषण आहारात

उंदरांच्या व घुशींच्या विष्ठा आढळल्याने सदर पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०५-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.
बहुजन भारत सामाजिक संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या तक्रारीनुसार संबंधित गटविकास अधिकारी व अधिक्षक (शापोआ) यांनी कमलापूर (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील शालेय पोषण आहाराच्या गोदामास भेट दिली असता गोदामामध्ये उंदराची व घुशीची विष्ठा आढळून आली.
(३) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सांगोला तालुक्यातील एकूण ४६२ पात्र शाळांपैकी ४०८ शाळांना सदर घटनेपर्यंत तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला होता. तसेच, उर्वरित शाळांना दिनांक १७ व १८ फेब्रुवारी, २०२५ रोजी पुरवठा करण्यात आला आहे.
(४) व (५) सदर गोदामामधील तांदुळ व धान्य आदी मालाची तपासणी करण्याकरिता नमूने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. सदर प्रयोगशाळा तपासणी अहवाल समाधानकारक प्राप्त झाले आहे. तसेच, प्रस्तूत प्रकाराच्या अनुषंगाने संबंधित संस्थेस शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

## धाराशिव जिल्ह्यातील तेर व नळदुर्ग येथील बस स्थानक बीओटी तत्त्वावर विकसित करण्याबाबत

**(४६) २४८१ (२५-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर (जि.धाराशिव) हे ऐतिहासिक ठिकाण असून तेथे संत श्रेष्ठ श्री गोरोबा काका यांचे पुरातन मंदिर असून येथे राज्य संरक्षित स्मारके व पुरातत्त्व विभागाचे पुराण वस्तू संग्रहालय आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नळदुर्ग, (ता.तुळजापूर) हे ऐतिहासिक ठिकाण राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ वर महाराष्ट्रातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला म्हणून प्रसिद्ध आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भाविकांची संख्या व पर्यटकांची संख्या पाहता तेथील बस स्थानक बीओटी तत्त्वावर विकसित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार बीओटी तत्वावर बसस्थानकासह दोन्ही बाजूस दुकान व हॉटेल्सकरिता गाळे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२२-०१-२०२६) :** (१), (२), (३) होय.
(४) व (५) रा.प.महामंडळातील तेर व नळदुर्ग येथील बसस्थानकाच्या बांधकामासाठी सार्वजनिक-खाजगी-सहभाग (PPP) तत्वावर उभारणेसाठी चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

## बदलापूर (जि.ठाणे) येथील लैंगिक अत्याचार प्रकरणी एन्काउंटर केलेल्या दोषी पोलीसांवर कारवाई करण्याबाबत

**(४७) ३३७७ (२६-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील लैंगिक अत्याचार प्रकरणी अटक करण्यात आलेल्या श्री.अक्षय शिंदे यांचा पाच पोलीसांनी एन्काऊंटर केला असल्याचे चौकशी अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असलेल्या पोलीसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) सदर प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाणे येथे दिनांक २४.०९.२०२४ रोजी अकस्मात मृत्यू नोंद क्र ३२६/२०२४, भारतीय न्यायसंहिता कलम १९४ प्रमाणे करण्यात आली आहे. मुंब्रा पोलीस ठाणे येथे दिनांक २४.०९.२०२४ रोजी गु.र.क्र. १९४०/२०२४ भारतीय न्यायसंहिता कलम २६२, १३२, १०९, १२१ सह शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) मुंब्रा पोलीस ठाण्याकडील सदर गुन्हयाचा व अकस्मात मृत्यूचा तपास सह पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या दिनांक २४.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये गुन्हयाचा व अकस्मात मृत्यूचा तपास राज्य गुन्हे अन्वेषन विभाग, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आला.

तद्नंतर मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक ०९.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपर पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर-वसई विरार यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयात सहसंचालक पदासह**
**निम्मे पदे रिक्त असल्याबाबत**

**(४८) ३३८६ (२८-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर,सांगलीसह अन्य चार जिल्हयाचे कार्यक्षेत्र असलेल्या व ४१ साखर कारखान्यांचा कारभार असलेल्या प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयात सहसंचालकांसह विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर आयुक्त कार्यालयातील इमारती दुरस्तीसाठी कारखान्यांकडून पर्यायाने शेतकऱ्यांकडून पैसे घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच प्रादेशिक साखर सहसंचलाक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०९-१२-२०२५) :** (१) प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर या कार्यालयात एकूण १० पदे मंजूर असून त्यापैकी ८ पदे भरली आहेत व कनिष्ठ लिपीक व वाहनचालक अशी २ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

साखर आयुक्त कार्यालयातील इमारत दुरुस्तीसाठी पैसे घेण्यात येत नाहीत. साखर कारखान्यांकडून मागील वर्षाच्या गाळपावर प्रतिटन ५० पैसे साखर संकुल निधीपोटी घेण्यात येतात. त्यामुळे शेतकऱ्यांना देय असलेल्या रकमेवर परिणाम होत नाही.

(३) वाहन चालकाचे पद तुर्तास कंत्राटी पध्दतीने भरले आहे. तसेच लिपिकाचे पद उपलब्धतेनुसार भरण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## परळी (जि.बीड) तालुक्यातील सरपंचाचा दुचाकी आणि टिप्पर च्या अपघातात झालेला मृत्यु

**(४९) ३४३७ (२७-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी (जि.बीड) तालुक्यातील राखेच्या टिप्पर दुचाकीला दिलेल्या धडकेत एका सरपंचाचा दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सरपंच हे परळीतून घरी येण्यासाठी दुचाकीने निघाले असता मिरवट-मांडवा पाटीजवळ परळीहून धर्मापुरीकडे जाणाऱ्या राखेच्या टिप्परणे समोरुन येऊन धडक दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी पो.स्टे. परळी ग्रामीण येथे गु.र.नं. १३/२०२५ भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५अ, १२५ब, सहकलम १३४, १८४ मोवाका अन्वये दिनांक १२.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदरच्या गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १२.०१.२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन सदरचा गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये सांस्कृतिक केंद्रासाठीच्या विकासाबाबत

**(५०) ३४४५ (२७-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये सांस्कृतिक कार्याला प्रोत्साहन देण्याकरिता त्या ठिकाणी सांस्कृतिक केंद्र व राखीव जागेवर नाट्यगृहाची उभारणी करण्याबाबत विकास आराखडा २०३४ मध्ये समावेश करण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, देवनार गावातील न.भू.क्र. ८८ या राखीव जागेवर सांस्कृतिक केंद्र व नाटयगृह यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील इतर राखीव जागांवर सांस्कृतिक केंद्र व नाट्यगृहाची उभारणी करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व कोणकोणत्या ठिकाणी उभारणी करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
याबाबत, मा.आमदार, श्रीमती सना मलिक यांनी दिनांक १३.१२.२०२४ रोजी एम / पूर्व विभागात झालेल्या सभेत सदर भूखंडाच्या हस्तांतरणाची कार्यवाही पार पाडण्याबाबत मागणी केली आहे.
(३) व (४) मुंबईत इमारत बांधकाम (पश्चिम उपनगरे) विभागातील सदयस्थितीतील कामे खालीलप्रमाणे-
१. पी / दक्षिण विभाग गोरेगांव (प.) पहाडी गाव, गोरेगांव न.भू.क्र. ७४६/१३, ७५० (भाग) ७५१, ७८४, ७८५ आणि ७८७ येथील टोपीवाला महानगरपालिका मंडईच्या पुनर्विकासाचे व सर्वसुविधायुक्त नाटयगृह व कर्मचारी

निवासस्थान यांचे काम प्रगतीपथावर आहे.

२. के / पश्चिम विभागामधील मौजे जुहू आणि विलेपार्ले येथील न. भू. मा. क्र. २०१ आणि ३३ जुहू येथे बहुद्देशीय समाज केंद्र (RSA २.१ ) + सांस्कृतिक केंद्र / नाटयगृह / सिनेमागृह (RSA ३.३) + क्लब / जिमखाना (ROS२.१) + वाहन तळ (RT१.६) साठी आरक्षित असलेल्या भूखंडावर सुसज्ज बहुद्देशीय समाज केंद्र + सांस्कृतिक केंद्र / नाटयगृह + जिमखाना + वाहन तळ इमारती अशा विविध प्रयोजनांसाठी इमारत बांधण्याचे प्रस्ताविले आहे.

३. न. भू. क्र. २८८ मौजे, कांदिवली गाव येथे समाज मंदिर / नाटयगृहासाठी आरक्षित जागेवर नाटयगृह उभारण्याची मागणी माननीय आमदार श्री. योगेश सागर यांनी केली असून प्राप्त मागणीनुसार आराखडे संमंत्रकाकडून तयार करून घेण्यात येत आहेत.

माजी मंत्री वने, सांस्कृतिक कार्ये व मत्सव्यवसाय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिनांक २७.०६.२०२४ रोजी मा. महानगरपालिका आयुक्त यांना पत्र अग्रेषित केले. सदर पत्रासोबत श्री. हेमंत भारकर, अध्यक्ष, चेतना युवक मंच, मानखुर्द मुंबई यांचे सांस्कृतिक सभागृह (मनोरंजन केंद्र) उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन जोडलेले आहे. सदरची जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अखत्यारीत असल्यामुळे याबाबत महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.